प्रेस नोट

| | |
|---|---|
| युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतीबंधक विभाग बुलढाणा |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | आरोपी लोकसेवक श्री.अच्युतराव माणिकराव काकडे,वय ३८ वर्ष व्यवसाय नोकरी,पद—ग्रामसेवक, ग्राम पंचायत पिंप्रीधनगर, अतिरीक्त पदभार जयरामगड, पंचायत समिती, कार्यालय, खामगाव,वर्ग—३ रा. गौतमनगर, धामणदरी, येळगाव, बुलढाणा ता. जि.बुलढाणा. |
| लाच मागणी | लाचमागणी ३६०००/— रुपये<br>तडजोडीअंती ३५०००/— रुपये |
| लाच स्विकारले | ३५०००/— रुपये |
| घटनास्थळ | बुलढाणा चिखली रोड हजी मंलग दर्ग्यासमोर, बुलढाणा ता.जि. बुलढाणा |
| घटना तारीख | ०८.०७.२०२३ |

थोडक्यात हकीकत :— यातील तक्रारदार य यांनी दिनांक ०८.०७.२०२३ रोजी लाप्रवि बुलढाणा घटकाकडे तक्रार दिली की, यातील आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांचे फर्म व्दारे ग्राम पंचायत जयरामगड येथील अनुसुचीत जाती व नवबौध्द घटकाचे वस्ती सुधार योजने अंतर्गत केलेल्या कामासाठी पुरविलेल्या साहित्याचे काढलेल्या बिलाचा मोबादला तसेच उर्वरीत बिलाचा चेक देण्यासाठी ३६,०००/— रुपये लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार दिली आहे.

तक्रारदाराने दिलेल्या तक्रारीची पडताळणी केली असता लोकसेवक श्री.अच्युतराव माणिकराव काकडे,वय ३८ वर्ष व्यवसाय नोकरी,पद—ग्रामसेवक, ग्राम पंचायत पिंप्रीधनगर, अतिरीक्त पदभार जयरामगड, पंचायत समिती, कार्यालय, खामगाव,वर्ग—३ यांनी ३५,०००/— लाचेची मागणी केली. त्यावरुन आयोजीत सापळा कारवाई दरम्यान आज दिनांक ०८.०७.२०२३ रोजी आरोपी यास ३५०००/— रुपये लाच स्वीकारतांना रंगेहात पकडण्यात आले असून त्यांचे विरुध्द पोलीस स्टेशन बुलढाणा शहर येथे अप.नं. ५८७/२०२३ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस मा. विशेष न्यायालय, बुलढाणा येथे हजर केले असता मा. न्यायालयाने आरोपीस दिनांक ११.०७.२०२३ रोजी पर्यत पोलीस कोठडी रिमांड मंजुर केली आहे. आरोपीच्या पोलीस कोठडीसाठी तपास अधिकारी श्री. सचिन इंगळे यांनी तसेच सहा.सरकारी अभियोक्ता श्री. हिवाळे यांनी युक्तीवाद केला आहे.

सदर कार्यवाही :— १. मा. श्री. मारोती जगताप, पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती
२. मा. श्री. देविदास घेवारे, अप्पर पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती
३. मा. श्रीमती शितल घोगरे, पोलीस उपअधिक्षक, लाप्रवि. बुलढाणा

यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी श्री.सचिन इंगळे, पोलीस निरीक्षक,ॲन्टी करप्शन ब्युरो बुलढाणा, पोना/जगदीश पवार, विनोद लोखंडे, मोहम्मद रिजवान, रविंद्र दळवी, मपोकॉ. स्वाती वाणी, पोकॉ. शैलेश सोनवणे, चापोकॉ. अरशद शेख यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो बुलढाणा कार्यालय दुरध्वनी कमांक ०७२६२—२४२५४८ व ९६५७०६६४५५ तसेच टोल फ्रि कमांक १०६४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो बुलढाणा यांनी केले आहे.

( श्रीमती शितल घोगरे )
पोलीस उपअधिक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा

Scanned with CamScanner